लोकमत

# विद्यापीठात संत गाडगेबाबा जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात संत गाडगेबाबा महाराजांची जयंती बुधवारी उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्या हस्ते संत गाडगेबाबांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही.एन. शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस.एस. महाजन, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए.एम. गुरव, केदार मारुलकर, दीपा इंगवले, अनुप मुळे, रामदास बोलके, गंधाली खारगे आदींची उपस्थिती होती.

लोकमत

# कुंभार यांच्या ग्रंथांचे आज प्रकाशन

कोल्हापूर : येथील प्राचार्य डॉ. प्रकाश कुंभार यांनी संपादित केलेल्या 'कोरोनानंतरचे जग : साद-पडसाद' आणि 'पाचलेणी' या ग्रंथांचे प्रकाशन आज, गुरुवारी सायंकाळी सहा वाजता राजर्षी छत्रपती शाहू स्मारक भवनमध्ये होणार आहे. या कार्यक्रमास शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी अपर्णा वाईकर, माजी महापौर मारुतराव कातवरे प्रमुख उपस्थित असणार आहेत.

लोकमत

# पुरुषोत्तम करंडक ११ मार्चपासून

कोल्हापूर : मराठी रंगभूमी आणि नाट्यरसिकांची अभिरुची जोपासणारी 'पुरुषोत्तम करंडक आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धा' दि. ११ ते १३ मार्च दरम्यान होत आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या भाषा भवनमध्ये ही स्पर्धा रंगणार आहे. स्पर्धेचे यंदाचे अकरावे वर्ष असून, महाराष्ट्रीय कलोपासक, पुणे व गायन समाज देवल क्लबच्यावतीने याचे आयोजन करण्यात आले आहे. शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र विभागाने २०१९पासून या स्पर्धेच्या आयोजनात सहभाग घेतला आहे. यात शिवाजी विद्यापीठांतर्गत येणाऱ्या सातारा, सांगली, कोल्हापूर तसेच बेळगाव येथील मराठी महाविद्यालयांनादेखील सहभागी होता येईल. स्पर्धेच्या प्रवेशिका ऑनलाईन उपलब्ध असून, अधिक माहितीसाठी उमा नामजोशी, गायन समाज देवल क्लब, खासबाग, कोल्हापूर येथे संपर्क साधावा, असे आवाहन संचालक सुबोध गद्रे यांनी केले आहे.

लोकमत

# विद्यापीठाच्या शनिवारच्या परीक्षा रविवारी होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** लोकसेवा आयोगाची शनिवारी (दि. २६) परीक्षा होणार आहे. त्यामुळे या दिवशी होणाऱ्या शिवाजी विद्यापीठाच्या पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा नियोजित वेळापत्रकाप्रमाणे रविवारी (दि. २७) घेण्यात येणार आहेत, अशी माहिती परीक्षा मंडळाने दिली आहे.

सध्या ऑनलाईन पद्धतीने सुरू आहेत. त्यात बुधवारी एम.कॉम., एम.एस्सी., बी.जे., एम.जे., बी.कॉम., बी.ए., बीसीए., बीबीए. आदी अभ्यासक्रमांच्या एकूण २२७ विषयांच्या परीक्षा झाल्या. ही परीक्षा देताना १२२ विद्यार्थी संशयास्पदरीत्या हालचाल करताना विद्यापीठाच्या विशेष पथकास आढळून आले. त्यांच्यावर विद्यापीठ नियमानुसार कारवाई करण्यात येणार आहे. बी.एस्सी. फूड टेक्नॉलॉजी सत्र पहिले या परीक्षेचा निकाल जाहीर झाला असल्याची माहिती परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी दिली. दरम्यान, बी.ए. भाग ३ च्या ऑनलाईन परीक्षेत काही विद्यार्थ्यांना बुधवारी तांत्रिक अडचणीचा सामना करावा लागला. पुन्हा परीक्षा देण्याची व्यवस्था उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

पुढारी




कोल्हापूर : विद्यापीठात आयोजित विज्ञान सप्ताहाच्या उद्‌घाटन समारंभात बोलताना केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सल्लागार डॉ. श्याम कोहली. डॉ. आर. जी. सोनकवडे, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. आर. के. कामत.

# परिघाबाहेरील विद्यार्थ्यांपर्यंत विज्ञानसंधी पोहोचाव्यात

## डॉ. कोहली : विद्यापीठात विज्ञान सप्ताहाचे उद्‌घाटन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

केंद्र सरकारने विज्ञान व तंत्रज्ञानाच्या सार्वत्रिकीकरणासाठी 'स्तुती' हा उपक्रम हाती घेतला आहे. विद्यापीठीय परिघाबाहेरील विद्यार्थ्यांपर्यंत विज्ञानातील संधींची माहिती पोहोचविण्यासाठी उपक्रमाचा लाभ व्हावा, अशी अपेक्षा केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सल्लागार डॉ. श्याम कोहली यांनी व्यक्त केली.

'आजादी का अमृत महोत्सवा'चे औचित्य साधून डीएसटी-स्तुती कार्यक्रमाअंतर्गत शिवाजी विद्यापीठात विज्ञान जागृती सप्ताह उद्‌घाटन समारंभप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. तरुण भारत वृत्तपत्र समूहाचे अध्यक्ष, लोकमान्य मल्टिपर्पज सोसायटीचे चेअरमन किरण ठाकूर प्रमुख उपस्थित होते.

डॉ. कोहली म्हणाले, भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त 'आजादी का अमृत महोत्सव' हा उपक्रम सर्व राज्यांसह केंद्रशासित प्रदेशात १२ मार्चपासून ७५ आठवडे राबविण्यात येत आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाकडून विद्यार्थ्यांमध्ये विज्ञानाबद्दल कुतूहल निर्माण व्हावे, वैज्ञानिक संशोधन विकासाबद्दल गोडी निर्माण व्हावी, यासाठी देशभरातील १३ केंद्रांची (हब) निवड करून हा उपक्रम राबविला जात आहे.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यार्थीदशेत प्रश्न पडणे हे प्रगती व यशाच्या शक्यतेच्या दिशेने पडलेले पहिले पाऊल असते. विद्यापीठात ज्ञानसंवर्धनाच्या अनेक संधी उपलब्ध आहेत. विज्ञान सप्ताहात सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी येथून बाहेर पडताना उपयुक्त माहिती घेऊन जावी. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत यांनी स्वागत केले. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले. डीएसटी-सैफ केंद्राचे प्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी आभार मानले.

2 4 FEB 2022 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासा : डॉ.शिंदे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

अलीकडे विद्यार्थ्यांमधील वैज्ञानीक दृष्टीकोन नष्ट होत आहे. तो जोपासणे आवश्यक आहे. हा वैज्ञानिक दृष्टीकोन त्यांच्यामध्ये निर्माण करण्यासाठी डीएसटी-स्तुती अंतर्गत शिवाजी विद्यापीठात विज्ञान जागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र.कुलसचिव डॉ.व्ही. एन.शिंदे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ भौतिकशास्त्र विभागात उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते.

'आजादी का अमृत महोत्सवा'चे औचित्य साधून विद्यापीठात दि. २२ ते २८ फेब्रुवारी याकालावधीत विज्ञान जागृती सप्ताह आयोजित केला आहे. याअंतर्गत आज देवाळे विद्यालय आणि जुनिअर कॉलेज, पन्हाळा आणि एसएमजी कॉलेज, कराड येथून आलेल्या शिवाजी विद्यापीठात भेट दिली. यावेळी त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या वैज्ञानिक दृष्टीकोनाबद्दलमाहिती दिली. डॉ. सी.व्ही.रमन, विल्यम गिल्बर्ट, जगदीशचंद्र बोस, कुलोम,मायकल फॅरेडे या शास्त्रज्ञांच्या उदाहरणातून वैज्ञानिक दृष्टीकोन पटवून दिला.

डॉ.शिंदे यांचा सत्कार डीएसटी-एसएआयएफ केंद्राचे प्रमुख डॉ.आर. जी.सोनकवडे यांनी केला. अश्विनी पाटील यांनी सुत्रसंचालन केले.

पुढारी

# विद्यापीठात गाडगेबाबा महाराज जयंती साजरी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात बुधवारी संत गाडगेबाबा महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. एस. एस. महाजन, डॉ. ए. एम. गुरव, डॉ. केदार मारुलकर, डॉ. दीपा इंगवले आदी उपस्थित होते.

24 FEB 2022 पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांपर्यंत विज्ञानाच्या संधी पोहोचवा

## डॉ. श्याम कोहली : शिवाजी विद्यापीठात विज्ञान सप्ताहाचे उद्घाटन

कोल्हापूर : प्रतिनिधी

केंद्र सरकारने विज्ञान व तंत्रज्ञानाच्या सार्वत्रिकीकरणासाठी 'स्तुती' हा उपक्रम हाती घेतला आहे. विद्यापीठीय परीघाबाहेरील विद्यार्थ्यांपर्यंत विज्ञानातील संधींची माहिती पोहोचविण्यासाठी या उपक्रमाचा लाभ व्हावा, अशी अपेक्षा केंद्र सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे सल्लागार डॉ. श्याम कोहली यांनी व्यक्त केली.

'आजादी का अमृतमहोत्सव'चे औचित्य साधून डीएसटी स्तुती कार्यक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठात दि. २२ ते २८ फेब्रुवारी या कालावधीत आयोजित केलेल्या विज्ञान जागृती सप्ताहाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. विद्यापीठातील एसएआयएफ-डीएसटी केंद्राच्या वतीने हा उपक्रम आयोजित केला होता.

डॉ. कोहली म्हणाले, 'आजादी का अमृतमहोत्सव' हा उपक्रम देशातील सर्व राज्यांसह केंद्रशासित प्रदेशात १२ मार्च २०२१ पासून पुढील ७५ आठवडे राबविण्यात येत आहे. याअंतर्गत देशभरातील १३ केंद्रांची (हब) निवड करून तेथे हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, विद्यार्थीदशेत प्रश्न पडणे, हे प्रगतीच्या आणि यशाच्या शक्यतेच्या दिशेने पडलेले पहिले पाऊल असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी भीडेवर मात करीत आपल्या शंकांचे समाधान करून घेणे ही फार महत्त्वाची बाब आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांनी प्रास्ताविक केले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार किरण ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती होती. विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. आर. के. कामत यांनी स्वागत केले, तर डीएसटी-सैफ केंद्राचे प्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी आभार मानले. अश्विनी पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

जनसंपर्क कक्ष
24 FEB 2022 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# न्यू कॉलेजमध्ये चर्चासत्राचे आयोजन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊस संचालित न्यू कॉलेज आणि शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र व शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाच्या ११ व्या वार्षिक अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार, दि. २५ व शनिवार, दि. २६ फेब्रुवारी रोजी दोन दिवस '१९९० नंतरची मराठी कादंबरी' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र होणार आहे, अशी माहिती न्यू कॉलेजचे प्राचार्य डॉ. व्ही. एम. पाटील यांनी पत्रकार परिषदेमध्ये दिली.

प्राचार्य पाटील म्हणाले, या चर्चासत्रामध्ये साहित्यिक, विचारवंत सहभागी होणार आहेत. शिविमतर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धांचे पारितोषिक वितरण, गुणवंत विद्यार्थी सत्कार, ललित, ललितेतर, संपादन साहित्य प्रकारातील ग्रंथ पुरस्कार, गुणवंत शिक्षक पुरस्कार, सेवानिवृत्त प्राध्यापक सत्कार, असे या कार्यक्रमाचे स्वरूप आहे.

चर्चासत्राचे प्रमुख पाहुणे म्हणून शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डी. टी. शिर्के उपस्थित राहणार आहेत. समारंभाचे उद्घाटन श्री प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंग हाऊसचे चेअरमन के. जी. पाटील यांच्या हस्ते आणि शिविमच्या अकराव्या अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा. अनिल गवळी यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. यावेळी नितीन रिंढे, रंगनाथ पठारे, प्रवीण बांदेकर, सोनाली नवांगुळ, किरण गुरव, रघुनाथ केंगार, दत्ता पाटील, रणधीर शिंदे आदींची प्रमुख उपस्थिती असणार आहे.

पत्रकार परिषदेला शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघाचे अध्यक्ष प्रकाश दुकळे, उपाध्यक्ष प्रवीण चंदनशिवे, सर्जेराव पद्माकर, गुंडोपंत पाटील, प्रा. अविनाश पाटील, न्यू कॉलेजचे उपप्राचार्य टी. के. सरगर, प्रा. आर. डी. धमकले आदी उपस्थित होते.

24 FEB 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासणे आवश्यक : डॉ. शिंदे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

अलीकडे विद्यार्थ्यांमधील वैज्ञानिक दृष्टिकोन नष्ट होत आहे. हा वैज्ञानिक दृष्टिकोन त्यांच्यामध्ये निर्माण करण्यासाठी डीएसटी-स्तुती अंतर्गत शिवाजी विद्यापीठात विज्ञान जागृती सप्ताहाचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे प्र. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले. शिवाजी



विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र विभागात उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. 'आजादी का अमृतमहोत्सवा'चे औचित्य साधून डीएसटी-स्तुती कार्यक्रमांतर्गत शिवाजी विद्यापीठात दि. २२ ते २८ फेब्रुवारी या कालावधीत विज्ञान जागृती सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. याअंतर्गत बुधवारी देवळे विद्यालय आणि जुनिअर कॉलेज, पन्हाळा आणि एसएमजी कॉलेज, कराड येथून आलेल्या शिवाजी विद्यापीठात भेट दिली.

डॉ. व्ही. एन. शिंदे म्हणाले, आपल्यामध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन असल्यास आपण कोणत्याही समस्येवर सहजपणे मात करू शकतो. डॉ. शिंदे म्हणाले, शाश्वत विकासासाठी विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा योग्य वापर करणे गरजेचे आहे.

यावेळी डॉ. व्ही. एन. शिंदे यांचा सत्कार डीएसटी-एसएआयएफ केंद्राचे प्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी केला. सूत्रसंचालन अश्विनी पाटील यांनी केले, तर आभार डॉ. सोनकवडे यांनी मानले.

24 FEB 2022

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# 'भारतीय कंपनी सचिव संस्थान' सोबत विद्यापीठाचा सामंजस्य करार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

भारतीय कंपनी सचिव संस्थान (आयसीएसआय, नवी दिल्ली) यांचा शिवाजी विद्यापीठासमवेत झालेला सामंजस्य करार अत्यंत दिशादर्शक असा मैलाचा दगड ठरेल, असा विश्वास संस्थेच्या पश्चिम विभागाचे चेअरमन राजेश तरपरा यांनी काढले. ऑनलाईन व ऑफलाईन अशा संमिश्र स्वरूपात करण्यात आलेल्या या कार्यक्रमात तरपरा हे ऑनलाईन सहभागी होऊन बोलत होते.




**कोल्हापूर : कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत सामंजस्य कराराचे हस्तांतरण करताना विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि आयसीएसआयचे पवन चांडक. सोबत मान्यवर.**

तरपरा म्हणाले, कंपनी सचिव पदासाठी आवश्यक प्रशिक्षण आणि प्रमाणपत्र प्रदान करणारी आयसीएसआय ही एकमेव संस्था आहे. केंद्र सरकारचे 'कुशल भारत' हे घोषवाक्य खऱ्या अर्थाने सिद्ध करण्यासाठी संस्था अधिकाधिक प्रशिक्षण कार्यक्रम व शैक्षणिक उपक्रम घेत आहे. शिवाजी विद्यापीठ आणि आयसीएसआय या दोन्ही संस्था प्रस्थापित आहेत. त्यांच्या अनुभवाचा लाभ परस्परांबरोबरच विद्यार्थ्यांनाही होईल. त्याचप्रमाणे विद्यापीठाने सेक्शन-८ कंपनी स्थापन केली असल्याचाही या कामी मोठा फायदा होईल, अशी आशाही त्यांनी व्यक्त केली.

संस्थेच्या पश्चिम विभागीय प्रादेशिक मंडळाचे सदस्य पवन चांडक म्हणाले, आयसीएसआयचे देशभरात व्यापक जाळे आहे. १६ आयआयएम संस्थांसह विविध मान्यवर विद्यापीठांशी संस्थेने ७५ सामंजस्य करार केले आहेत. त्यामध्ये शिवाजी विद्यापीठाच्या रुपाने एका दमदार साथीदाराचा समावेश झाल्याचा आनंद वाटतो.

अध्यक्षीय भाषणात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, कंपनी सचिव या क्षेत्रातील संधींविषयी अद्याप शहरी भागाखेरीज बहुसंख्य विद्यार्थी अनभिज्ञ आहेत. या सामंजस्य करारांतर्गत वर्षभरात राबविल्या जाणाऱ्या उपक्रमांचे विस्तृत नियोजन करावे आणि त्यानुसार वाटचाल करावी, तेव्हाच खऱ्या अर्थाने करार यशस्वी होईल.

याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्यासह आयसीएसआय कोल्हापूर शाखेच्या चेअरपर्सन ऐश्वर्या तोरस्कर, व्हाईस चेअरमन ज्योतिबा गावडे यांनी मनोगत व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आणि आयसीएसआयकडून पवन चांडक यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी केल्या. मान्यवरांच्या उपस्थितीत कराराच्या नस्तींचे हस्तांतर करण्यात आले.

अधिष्ठाता डॉ. एस. एस. महाजन यांनी प्रास्ताविक केले, तर डॉ. केदार मारुलकर यांनी आभार मानले. यावेळी आयसीएसआयचे अमित पसारे आणि अमित पाटील उपस्थित होते.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात संत गाडगेबाबा जयंती

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात बुधवारी संत गाडगेबाबा महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय भवनात कुलगुरू डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू पी. एस. पाटील यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. यावेळी कुलसचिव व्ही. एन. शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता एस. एस. महाजन, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक ए. एम. गुरव, केदार मारुलकर, दीपा इंगवले, अनुप मुळे, रामदास बोलके, गंधाली खारगे आदी उपस्थित होते. दरम्यान, संत गाडगेबाबा महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध अधिविभागांसह प्रशासकीय विभागांत अंतर्गत स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

2 4 FEB 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संत गाडगेबाबा जयंतीनिमित्त ठिकठिकाणी स्वच्छता मोहीम

**कोल्हापूर, ता. २३ :** शहरात ठिकठिकाणी स्वच्छता मोहीम, जनजागृती रॅली, शपथ, कार्यशाळा, प्रतिमापूजन करीत संत गाडगेबाबा यांची जयंती साजरी केली.

**शिवाजी विद्यापीठ**

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. एस.एस. महाजन, कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव, डॉ. केदार मारूलकर, डॉ. दीपा इंगवले, डॉ. अनुप मुळे, डॉ. रामदास बोलके, डॉ. गंधाली खारगे आदी उपस्थित होते. विविध अधिविभागांसह प्रशासकीय विभागांत स्वच्छता मोहीम राबविली.





**कोल्हापूर : कसबा बावडा, रमण मळा परीट समाजातर्फे प्रसाद वाटप झाले. बावडा स्मशानभूमीत लिंब, वड, पिंपळाचे रोपण केले. या वेळी गजानन परीट, कुंडलीक परीट, राजाराम परीट, नागनाथ सोनटक्के, आनंद खामकर, भानुदास शिंदे, गोरख पोवार, दत्ता पोवार, मोहन परीट, तानाजी परीट, बाबूराव सोनटक्के, महादेव गवळी, नामदेव परीट आदी. दुसऱ्या छायाचित्रात परीट समाजातर्फे संत गाडगेबाबांना अभिवादन करताना उपस्थित.**

**महापालिकेतर्फे जनजागृती**

कोल्हापूर : महापालिकेतर्फे देवकर पाणंद परिसरात स्वच्छतेबाबत जनजागृती करण्यात आली. शाळा, महाविद्यालयांत स्वच्छतेची शपथ दिली. प्रशासक डॉ. कादंबरी बलकवडे, उपायुक्त रविकांत आडसूळ, शिल्पा दरेकर यांच्या जनजागृती राबविली. छत्रपती राजे शिवाजी रिक्षा मित्र मंडळ व महापालिकेतर्फे स्वच्छता मोहीम व प्लास्टिक संकलन केले. राजलक्ष्मीनगर परिसरात जनजागृतीपर रॅली काढली. सदरबाजार येथील सद्गुरू गाडगे महाराज विद्यामंदिर येथे सायबर कॉलेज समाजशास्त्र विभाग व महापालिकेतर्फे स्वच्छतेविषयक कार्यशाळा झाली. माहिती शिक्षण व संवाद अधिकारी निलेश पोतदार, स्वछतादूत अमित देशपांडे, शिवाजी शिंदे, करण्रा लाटवडे, पर्यावरण विभागाचे केवल लोट आदी उपस्थित होते.

**लोकराज्य जनता पार्टी**

कोल्हापूर : लोकराज्य जनता पार्टीतर्फे सानेगुरुजी वसाहत येथील कार्यालयात शहर सरचिटणीस संतोष बिसुरे यांच्या हस्ते प्रतिमेस पुष्पहार केला. अध्यक्ष अनिल चव्हाण यांनी स्वागत केले. जिल्हा सरचिटणीस अमोल कांबळे, पी. के. पाटील यांनी गाडगेबाबांच्या समाजकार्याची माहिती दिली. किशोर सातपुते यांनी आभार मानले. अभिजीत पाटील, नितीन कांबळे, शहर संघटक शशिकांत जाधव, बुद्धम् कांबळे, हर्षद चव्हाण आदी उपस्थित होते.

**परीट समाज**

कोल्हापूर : राष्ट्रसंत गाडगे बाबांची जयंती परीट समाजातर्फे साजरी झाली. महापालिका उपायुक्त शिल्पा दरेकर यांच्या हस्ते पुतळ्यास पुष्पहार घालून पूजन केले. नागरिकांना झुणका भाकर प्रसाद वाटप केले. समाजाचे अध्यक्ष प्रकाश भालकर, देवस्थान समितीचे सचिव शिवराज नाईकवाडे, ऋतुराज क्षीरसागर, आदिल फरास, उपाध्यक्ष संदीप भालकर, सचिव उदय भालकर, पश्चिम महाराष्ट्र परीट समाजाचे सचिव वसंतराव वठारकर, कार्यालय सचिव उमेश बुधले, संचालक शशिकांत भालकर, दीपक भालकर, दशरथ लोखंडे, दीपक लिंगम, दीपक म्हेतर, महेशकुमार खडके, दीपक लोखंडे, महिला अध्यक्षा मानसी भालकर, उपाध्यक्षा कविता भालकर, सचिव स्वप्नाली खडके, जिल्हाध्यक्ष वृंदा वठारकर, सहसचिव सोनू कालेकर, राजश्री भालकर, किर्ती शिंदे, रंजना भोसले, सविता भालकर, सुनीता पोवार, सुनील परीट उपस्थित होते.

24 FEB 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# गुळापासून बनले साठहून अधिक पदार्थ

## शिवाजी विद्यापीठात प्रशिक्षण; उद्योजकता, कौशल्य विकास केंद्राची कामगिरी

कोल्हापूर, ता. २३ : शिवाजी विद्यापीठाच्या उद्योजकता, कौशल्य विकास केंद्रामार्फत गुळापासून एक-दोन नव्हेतर साठपेक्षा अधिक पदार्थ बनवण्याचे प्रशिक्षण, मार्गदर्शन गूळ उद्योजकांना दिले जाते. गूळ कँडी, पावडर, काकवी, गुळाचा चहा, गुळाची चॉकलेट अशा पदार्थांचा समावेश आहे.

शिवाजी विद्यापीठातील उद्योजकता, कौशल्य विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव गुळवे, शेतकऱ्यांना मार्गदर्शन करीत असतात. स्वतः डॉ. गुरव वीस वर्षांहून अधिक काळ गुळावर संशोधन करीत आहेत. त्यांनी २५ गुळवे प्रशिक्षण शिबिरे घेतली. सध्या सहा गूळ प्रकल्प कार्यरत आहेत. यात सांगली, मजले, रहिमतपूर, पंचतारांकित एम.आय.डी.सी, नेज, कणेरी मठ येथील गूळ-उत्पादन प्रकल्पांचा समावेश आहे.



कोल्हापूर : गुळाच्या विविध उपपदार्थ उत्पादनांसमवेत डॉ. ए.एम. गुरव

### असाही गूळ

गुळाची ढेप, पावडर, गुळाचे वेगवेगळ्या आकाराचे क्यूब (घन), काकवी, मोदक, गुळाचे ग्रॅन्युल्स, गुळाचे कॅडबरीसदृश चॉकलेट्स, गुळाचे सरबत, गुळाची बिस्किटे, नाचणी-गुळाची बिस्किटे, गूळ चहा प्री-मिक्स, गूळ कॉफी प्री-मिक्स, गूळ लिंबूपाणी, चिक्की, चणा डाळ, गूळ सुजी, डार्क चॉकलेट, गूळ कँडी ज्यात इलायचीसह नऊ वेगवेगळे फ्लेवर उपलब्ध आहेत. आईस्क्रीम, मँगो आईस्क्रीम तयार केले आहे. चिरमुरा लाडू, राजगिरा लाडू, बुंदीचे लाडू, नाचणीचे लाडू, गुळाची रेवडी बनवले जातात. हळद, गुळ पावडर एकत्र करून त्यापासून कॅप्सूल तयार केली आहे. मिकी माऊस, ससा, बैल, हत्ती आदी खेळणी, भेटवस्तूही गुळापासून बनविता येतात.

डॉ. गुरव म्हणाले, "शरीरासाठी लाभदायक गुळापासून विविध पदार्थ बनवण्याचा व्यवसाय वाढत आहे. या व्यवसायातून रोजगारनिर्मितीही होत आहे. सध्या कोल्हापूरजवळील ५ ते १० गुऱ्हाळ घरांवर कार्यशाळा घेण्याचा मानस आहे. गुळात साखरेची भेसळ करून गोडवा वाढवण्याचे प्रकार काही ठिकाणी घडतात. अशा प्रकारांपासून शेतकऱ्यांनी दूर राहायला हवे. गुळापासून बनणाऱ्या पदार्थांचे उत्पादन घेण्यासाठी तरुण उद्योजक, बँका आणि शासनाची सकारात्मक भूमिकांची सांगड आवश्यक आहे. हा व्यवसाय सुरू करणे सुरुवातीला थोडे खर्चिक असले तरी तरुणांनी एकत्र येऊन हा व्यवसाय सुरू करणे शक्य आहे.

गुळापासून बनवलेल्या उत्पादनांचा उपयोग सणा-सुदीला भेट देण्यासाठीही होत आहे. मुंबई-पुण्यासारख्या शहरी भागात बाजारपेठ उपलब्ध होते." डॉ. गुरव २०१३ मध्ये गुळापासून बनवलेल्या पदार्थांचे मार्केटिंग करण्यासाठी दुबईला गेले होते.

24 FEB 2022

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘मंथली इनोव्हेशन चॅलेंज’चे व्यासपीठ शिवाजी विद्यापीठात उपलब्ध

कोल्हापूर, ता. २३ : शिवाजी विद्यापीठ सेंटर फॉर इनोव्हेशन, इनक्युबेशन ॲण्ड लिंकेज, एसयूके रिसर्च ॲण्ड डेव्हलपमेंट फाउंडेशनच्या माध्यमातून विद्यार्थी, संशोधक, प्राध्यापक, समाजातील संवेदनशील, सर्जनशील वैयक्तिक भागधारकांना समाजातील विविध प्रश्नांवर उपाय शोधण्याकरिता एक व्यासपीठ उपलब्ध करून देत आहे.

इनोव्हेशन चॅलेंज हे सामान्य माणसाला येणाऱ्या समस्यांवर सर्जनशील, नाविन्यपूर्ण, आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य उपाय देण्याकरिता नवउद्योजकांना निमंत्रित करीत आहे. शोधलेली समस्या संबंधित क्षेत्राच्या उत्पादनाशी किंवा प्रक्रियेशी संबंधित असावी. सहभागींनी संबंधित क्षेत्रातील दैनंदिन जीवनातील समस्या ओळखणे अपेक्षित आहे. त्यांचे नावीन्यपूर्ण उपाय करावेत. याकरिता गुगल फॉर्मच्या माध्यमातून एक लिंक तयार केलेली असून ही लिंक विद्यापीठाच्या वेबसाईटवर उपलब्ध करून दिलेली आहे. फेब्रुवारीची संकल्पना सामान्य माणसाला येणाऱ्या समस्यांबाबत आहे. या समस्यांना संबोधित करण्यासाठी आमंत्रित केलेल्या प्रमुख क्षेत्रांमध्ये गतिशीलता, ई-गव्हर्नन्स, प्रवेश, शिक्षण, कौशल्य आणि उपजीविका, आरोग्याचा समावेश असेल. या संकल्पनेसह प्रत्येक संवेदनशील व्यक्ती, उद्योजक, दिव्यांग व्यक्तींना नावीन्यपूर्ण उपायांचा एकत्रितपणे शोध घेण्यासाठी संधी उपलब्ध करून देण्याचा आमचा मानस आहे, अशी माहिती नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य केंद्राचे संचालक प्रा. डॉ. एम. एस. देशमुख यांनी केले आहे.